# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०३ जुलै, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# रामनगर पोलीसांकडुन सायकल चोरीचे सहा गुन्हे उघडकीस

पोलीस स्टेशन रामनगर मध्ये सायकल चोरीचे प्रमाण जास्त झाले असल्याने मा. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी रामनगर पोलीसाना आरोपीचा शोध घेणेकामी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन रामनगरचे पोलीस निरीक्षक प्रकाश हाके यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवुन पथक तयार केले त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन रामनगर हद्दीमधुन सन २०१९ व २०२० या मधील चोरीस गेलेल्या सायकलचे गुन्हयाचा छडा लावण्यास गुन्हे शोध पथकास यश आले असुन आरोपी अब्दुल हमीद शेख रा. भद्रावती यास अटक करुन रामनगर पोलीस ठाणेकडील तब्बल आठ सायकल रुपये किमंत ५०,०००/—रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले असुन रामनगर पोलीस ठाण्याचे एकुण सहा गुन्हे उघडकीस आणण्यास रामनगर पोलीसाना यश आलेले आहे.

सदरच्या गुन्हयाचा उलगडा मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, उपविभागीय अधिकारी श्री. शिलवंत नांदेडकर यांचे मार्गदर्शनाखाली रामनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक प्रकाश हाके याचें नेतृत्वात सपोनी संतोष दरेकर, सफौ प्रभुदास माहुलीकर, पोहवा आंनद परचाके, पोहवा. गजानन डोहीफोडे, नापोका शंकर येरमे, नापोका रामभाऊ राठोड, पोशि निलेश मुळे, माजीद पठाण यांनी केला आहे.